सं.फौ.ख.क्र. १०४६/२०२२
सरकार वि. शेख युसुफ
निशाणी क्र. १९

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ४ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – शुभम दादाराव नाकाडे

वय – २८ वर्ष, व्यवसाय – शेती

राहणार – बोरी सिंगुरी, ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे**

१. घटना दि.१२/०६/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजताचे सुमारास खंडाळा शिवार येथे घडली होती. मला माझा भाऊ अश्वीन याने फोन करुन घटनेबाबत माहिती दिली. त्यानंतर मी घटनास्थळी गेलो. त्यावेळी तेथे उपस्थित लोकांनी रुग्णवाहिका मधून माझा भाऊ व वहिनी यांना आशा हॉस्पीटल येथे नेले. घटनास्थळी एक ट्रक क्रमांक एमएच–४०–एन–४२५३ उभा होता. त्याचा चालक तेथे नव्हता. पोलीसांच्या सांगण्यावरुन मी सदर ट्रक पोलीस स्टेशन येथे आणून लावला. त्यानंतर मी आशा हॉस्पीटल मध्ये गेलो. पोलीसांनी माझे बयान घेतले होते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील रिना गणवीर यांच्यातर्फे.**

२. पोलीसांनी माझे बयान दिनांक १६/०६/२०२२ रोजी घेतले. हे म्हणणे खरे आहे की मी घटना प्रत्यक्ष पाहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की उपरोक्त ट्रक क्रमांक मी आज रोजी माझे बयान वाचून सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2024.07.05 15:17:28 +0530

**(रा.र. शेरेकर)**

ठिकाण –कामठी

दिनांक –०५/०७/२०२४

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.